# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना** :- सतरंजीपुरा झोन अंतर्गत प्रभाग क्र. २० बारसेनगर येथील
**{सा.बां.वि. झोन क्र. ०७}** डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानातील सुमारे ३० वर्षे जुनी व्यायामशाळाची इमारत, बांधकाम क्षेत्र १८८.६६ चौ.मी. जीर्ण झाल्यामुळे तसेच या ठिकाणी नागपूर सुधार प्रन्यास व्दारे नवीन व्यायामशाळा प्रस्तावित असल्याने सदर इमारत पाडण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :-

१. जुन्या इमारत बाबतची स्ट्रक्चरल ऑडीट अहवाल नस्तीस उपलब्ध आहे.
२. सदर बांधकाम तोडण्यास्तव उद्यान विभाग, मनपा यांची नाहरकत पत्र प्राप्त आहे.
३. या ठिकाणी नागपूर सुधार प्रन्यास यांचे व्दारे नवीन व्यायामशाळेचे बांधकाम प्रस्तावित आहे.
४. इतर सविस्तर माहिती नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- ०४/मनपा/प्रशासक** **दिनांक :- २७/११/२०२३**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सतरंजीपुरा झोन क्र. ०७ यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार सतरंजीपुरा झोन अंतर्गत प्रभाग क्र. २० बारसेनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानातील सुमारे ३० वर्षे जुनी व्यायामशाळाची इमारत, बांधकाम क्षेत्र १८८.६६ चौ.मी. जीर्ण झाल्यामुळे तसेच या ठिकाणी नागपूर सुधार प्रन्यास व्दारे नवीन व्यायामशाळा प्रस्तावित असल्याने सदर इमारत पाडण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**

**डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**